सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्
दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. १६१ / वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : १९ / ०७ / २०२२

# -: प्रेसनोट :-

## वाकोला पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १७/०७/२०२२ रोजी २२:०० वा. चे सुमारास फिर्यादी श्री सिकंदर महंमद रफिक कुरेशी, वय ३३ वर्षे, धंदा नोकरी, रा.ठी. रुम नं ०६, फातीमा मंजिल, कलिना कोलावरी व्हिलेज रोड, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई हे फातीमा मंजिल समोर, कलिना कोलावरी व्हिलेज रोड, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई या ठिकाणी असतांना यातील अटक आरोपीने फिर्यादी यांच्या भावाने आरोपीताविरुध्द तक्रार केल्याने त्याचा राग मनात धरुन फिर्यादी व फिर्यादीच्या परिवारास शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीस गळयावर धारदार लोखंडी कोयत्याने वार करुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशने प्रयत्न केला.च म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गु.र.क्र ७५०/२२ कलम ३०७, ५०४, ५०६ (२) भा.द.वि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.